# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ५६१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—०३/०९/२०१६

**१) अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०१/०९/२०१६ रोजी १७.३० वा. दर. यातील तिन्ही आरोपीतांनी त्यांचा गट निर्माण करून पिडीत अल्पवयीन फिर्यादी मुलीस फुस लावुन तीला आपल्या सोबत घेवुण जावुन आरोपी क्र. २ ने तिच्यावर अत्याचार केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३७६,(२)(आय)(ड),३६३,३६६,(अ) भांदवि. सहकलम ६, १७ बा.लै.अत्या.सं.कायदा २०१२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. चौधरी पो. स्टे. मोहाडी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) मोटार सायकलची चोरी . :—**

दिनांक ०२/०९/२०१६ रोजी १०.३० ते ११.०० वा. दर. यातील फिर्यादी एकनाथ रघुनाथ गायधने वय ४५ वर्ष रा. चालना हा आपल्या मोटार सायकल हिरो होंन्डा क्र. एमएच. ३६ एन १३४७ कि. ३०,०००/—रू. भाच्या च्या घरासामोर ठेऊन जेवनाकरीता गेला असतांना कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण मोटार सायकल पोहरा येथुन चोरून नेल्याने असे फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पो. स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**३) दारूडया वाहन चालकांवर कारवाई. :—**

दिनांक ०२/०९/२०१६ रोजी १०.०० वा. दर. दरम्यान आरोपी मोटार सायकल क्र. एमएच ३५ ई ७०५५ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल दारू पिवुन दारूच्या नशेत बस स्थानक समोर साकोली येथे वाकडी—तिकडी चालवितांना मिळुन आला. त्याचे डॉ. परिक्षण रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १८५(१) मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. निंबार्ते पो. स्टे. साकोली हे करीत

**४) जादुटोण्याच्या कारणावरून अश्लिल शब्दात शिविगाळ केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०१/०९/२०१६ रोजी २१.०० वा. दर. यातील फिर्यादी ही आपल्या घरी मुलीसह हजर असतांना यातील आरोपीला फिर्यादी माहार जातीची आहे. हे माहीत असुन सुध्दा तिचे घरा समोर ऊभे राहुन फिर्यादीच्या पतीचे नाव घेवुण जादुखोर महा—या, धेंडया याला घराचे बाहेर काढा हा जादुखोर आहे असे बोलुन अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३,(१)(आर)(एस),अ.जा.ज.अ.प्र.का. सुधारना कायदा सहकलम २,(१)(फ),६,३ महा. जादु. प्र. अधि. सहकलम २९४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोलीस उपविभागिय अधिकारी संखे पो. स्टे. साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई.:—**

दिनांक ०२/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ५८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती १५ केसेस, तसेच ईतर वाहनांवरती ४३ केसेस करण्यात आले आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०,

प्रति

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.